# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240-2336172**


**Case No: CGRF/AZ/U/141/2008/62/** **Date:-**

**To,**
**The Executive Engineer ( Administration)**
**O/O Superintending Engineer (O&M)**
**Urban Circle, M.S.E.D.C.L.,**
**Aurangabad.**

Sub:- Forwarding of grievance in respect of Shri Doijode Arvind Raghunathrao, Ashtavinayak , Enclave ,3/D/B-1, Station Road, Near Hotel Shrimaya,Bansilalnagar, Aurangabad. (Consumer No.490011543399)

**Dear Sir**

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Doijode Arvind Raghunathrao, Ashtavinayak , Enclave, 3/D/B-1, Station Road, Near Hotel Shrimaya, Bansilalnagar, Aurangabad.

The consumer has requested for passing an interim order for not to disconnect his supply on account of average reading.

You are requested to submit your reply on the grievance of the consumer at the time of hearing .

**The hearing in this matter is kept on 14/10/2008 at 13=40 hrs.**

Member/Secretary,
CGRF(AZ) MSEDCL,Aurangabad.

**Encl As above**.

Copy to :
Shri Doijode Arvind Raghunathrao,
Ashtavinayak , Enclave ,3/D/B-1,
Station Road, Near Hotel Shrimaya,
Bansilalnagar, Aurangabad.

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४१/२००८/६२**

**तक्रार दाखल दिनांक ;- १०/१०/२००८**
**निकाल दिनांक ;- ०३/११/२००८**

**श्री डोईजोडे अरविंद रघूनाथराव,**
**अष्टविनायक इनक्लेव्ह,३/डी/बी.१**
**हॉटेल श्री माया जवळ स्टेशनरोड,**
**बन्सीलालनगर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११५४३३९९) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (शहर मंडळ,)**
**औरंगाबाद. गैरआर्जदार**

## आदेश

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची- अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १०/१०/२००८ रोजी औरंगाबाद शहर मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली व या बाबतीत त्यांचे म्हणणे १५ दिवसाच्या आत दाखल करण्याचे सांगण्यात आले. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक १४/१०/२००८ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदार हे अष्टविनायक इनक्लेव्ह या इमारतीत भाडयाने राहत असून घरगुती वापरसाठी विजेचा वापर करीत आहे. महावितरण कंपनीकडून मार्च २००८ पर्यत देण्यात आलेले वीज बिल हे त्यांनी नियमीतपणे भरले असून त्यांचा सरासरी विजेचा वापर प्रतिमहा १०० ते १५० युनिट असा आहे. महावितरण कंपनीकडुन त्यांना एप्रिल २००८ या महिन्याचे ५१८७ युनिट वीज वापराचे बिल आकारण्यात आले व याबाबात संबंधीत विभागाकडे तक्रार केल्यानंतर त्यांना वीज बिलाची दुरूस्ती करून न देता पार्टपेमेंट भरण्यास सांगण्यात आले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्यांनी सतत पाठपुरावा केल्यानंतर ही वीज बिल दुरूस्त करून न दिल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली आहे. महावितरण कंपनीस वीज बिल दुरूस्त करून देण्याबाबत तसेच या चुकीच्या वीज बिलापोटी त्यांचा वीज पुरवठा खंडीत न करण्याबाबत आदेश देण्याबाबत ची विनंती त्यांनी मंचास केली आहे.

२) दिनांक १०/१०/२००८ रोजी चुकीच्या वीज बिलापोटी वीज पुरवठा खंडीत करू नये याबाबत अंतरीम आदेश पारीत करण्याबाबतच्या अर्जावर सुनावणी ठेवण्यात आली. या सुनावणीच्या वेळी अर्जदार प्रतिनिधी श्री रामेश्वर करवा तसेच नोडल अधिकारी श्री जी.एस.राठौर उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी सी.पी.एल. स्थळ पाहणी अहवाल हे संबंधीत विभागाकडुन मिळाले नसल्याचे सांगितले. मंचाने अर्जदाराचा मागील एक वर्षाचा वीज वापराचा आढावा घेतल्यानंतर एप्रिल २००८ मध्ये अर्जदारास देण्यात आलेले ५१८७ युनिट वापराचे वीज बिल हे जास्तीचे असल्याचे आढळुन आले व या चुकीच्या वीज बिलापोटी अर्जदाराचा वीज पुरवठा खंडीत होवु नये म्हणून महावितरण कंपनीस अर्जदाराच्या मंचात दाखल केलेल्या तक्रारीचे निवारण होई पर्यंत त्याचा वीज पुरवठा खंडित करू नये असा अंतरीम आदेश पारीत केला या प्रकरणाची पुढील सुनावणी २१/१०/२००८ घेण्याचे ठरविले.

३) दिनांक २१/१०/२००८ रोजी नोडल अधिकारी व अर्जदार प्रतिनिधी उपस्थित होते, नोडल अधिकारी यांनी अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीवर आपला जबाब मंचात दाखल केला त्याच प्रमाणे अर्जदारास देण्यात आलेली बिल चुकीचे असल्याचे मान्य करत त्यांनी ६६०९४.६३/-रूपयाचे क्रेडीट देण्याची तयारी दर्शवीली. नोडल अधिकारी यांनी आपला जवाबासोबत बिल रिव्हीजन शिट तसेच सी.पी.एल.दाखल केले.

४) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल झालेल्या कागदपत्रावरून तसेच अर्जदाराच्या सी.पी.एल.चे अवलोकन केल्यानंतर असे आढळुन येते की, मार्च २००८ पर्यंत अर्जदारास मिटरवरील नोंदीप्रमाणे वीज बिल आकारण्यात येत होते ज्याचा भरणा अर्जदाराने नियमितपणे केलेला आहे. महावितरण कंपनीतर्फे मार्च २००८ मध्ये अर्जदाराच्या येथे लावलेले जुने मिटर (क्रमांक ४१५११७) हे बदलून त्या जागी नविन मिटर (क्रमांक ८३०२२८) हे लावण्यात आले. पण या बदलण्यात आलेल्या मिटरची नोंद न घेता आर्जदारास १०३७४ युनिट वीज वापराचे बिल आकारले असल्याचे दिसुन येते जे चुकीचे असल्याचे स्वतः नोडल अधिकारी यांनी आपल्या जवाबात म्हटले आहे. नोडल अधिकारी यांनी मार्च २००८ ते मे २००८ या तीन महिन्याचे एकुण ५५५ युनिट वीज वापराचे वीज बिल हे तीन महिन्यात विभागुन देण्याची तयारी दर्शविली आहे. ग्रहकाचा सरासरी वीज वापर लक्षात घेता ते योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर मंच या प्रकरणी खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१)	महावितरण कंपनीने अर्जदाराचे मार्च २००८ ते मे २००८ या काळाचे एकुण ५५५ युनिट वीज वापराचे बिल हे तीन महिन्यात विभागुन द्यावे व त्याप्रमाणे ३० दिवसाच्या आत अर्जदारास सुधारीत वीज बिल देण्यात यावे.

२)	वरीलप्रमाणे देण्यात येणा-या सुधारीत वीज बिलात कोणतेही व्याज व दंड आकारू नये.

३)	महावितरण कंपनीने चुकीच्या वीज बिलापोटी अर्जदारास दिलेल्या मानसिक त्रासापोटी रूपये २५०/- तीस दिवसाच्या आत द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **आ. नि. सोनवणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/यु/१४१/२००८/६२** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री डोईजोडे अरविंद रघूनाथराव,**
**अष्टविनायक इनक्लेव्ह,३/डी/बी.१**
**हॉटेल श्री माया जवळ स्टेशनरोड,**
**बन्सीलालनगर, औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९००११५४३३९९)**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/यु/१४१/२००८/६२ )

आपण दिनांक १०/१०/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. शहर मंडळ, औरंगाबाद**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**